CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com बुधवार दि. २ नोव्हेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३६ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# कारखानदार अन् शेतकऱ्यांतील संघर्ष वाढला; पन्नासपेक्षा जास्त वाहनांचे टायर फोडून राग काढला

## शेतकऱ्यांचा गनिमी कावा; कारखानदारांचे आडमुठे धोरण; वाहतुकदार परेशान

✔ सुराज्य/सोलापूर

**ऊसदरासाठी संघर्ष समिती आणि कारखान्यांच्या प्रतिनिधींची ऊसदराची बैठक फिसकटल्यानंतर दर आंदोलन अधिक आक्रमक वळणावर पोहोचले असून रस्त्यारस्त्यावर ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचे टायर फोडले जात आहेत. काल रात्री जवळपास सोलापूर जिल्ह्यामध्ये पंढरपूर, माढा, माळशिरस, मंगळवेढा इत्यादी भागांमध्ये ५० ते ६० ट्रॅक्टरचे टायर फोडण्यात आले आहेत.या आंदोलनाला शेतकऱ्यांची छुपीसाथ मिळत असून संघर्ष समितीच्या गनिमी काव्याने वाहतुकदार परेशान झाला आहे. दुसरीकडे कारखानदाराच्या बेदखल भूमिकेमुळे हे आंदोलन आता अधिकच आक्रमक होत आहे. सोलापूर जिल्हाधिकारी यांनी काही मार्ग निघण्याच्या अपेक्षेने बैठक बोलावली होती परंतु कारखानदारांनी याला प्रतिसाद न देता आडमुठे धोरण स्विकारले. त्यामुळे संघर्ष अधिकच तीव्र होत चालला आहे.**



ऊसाचा अंतिम दर ३ हजार १०० आणि पहिली उचल २ हजार ५०० रुपयांची द्यावी या मागणीसाठी उसदर संघर्ष समितीने आंदोलनाचे हत्यार हाती घेतले आहे. पंढरपूर येथे ऊस परिषद घेवून या मागणीसह अन्य मागण्या करण्यात आल्या होत्या आणि कारखान्यांना दोन दिवसांची मुदत दिली होती. कारखान्यांनी या परिषदेच्या मागण्याची आणि आंदोलनाची कसलीही दखल घेतली नाही त्यामुळे टप्प्याटप्प्याने संघर्ष समितीने आपले आंदोलन अधिक उग्र करण्यास सुरुवात केली आहे. त्याचा परिणाम रस्त्यारस्त्यावर दिसू लागलेला आहे. समिती आणि कारखाने यांच्यातील बैठकीतून काहीच निष्पन्न झाले नाही त्यामुळे या आंदोलनाची धार वाढू लागली असल्याचे चित्र दिसत आहे. सोलापूर जिल्ह्यातील विविध भागात टायरफोड आंदोलन वेग धरू लागले आहे. ऊस दर संघर्ष समिती व साखर कारखानदारांमध्ये ऊस दराची बैठक निष्फळ ठरली आहे. साखर कारखान्याचे चेअरमन या बैठकीत उपस्थित राहिले नाहीत.

त्यामुळे काही तोडगा निघण्याचा प्रश्नच आला नाही. या अनुपस्थितीचे तीव्र पडसाद सोलापूर जिल्ह्याच्या विविध भागात उमटत आहेत. बार्शी-कुर्डवाडी रोडवर शेंद्री स्टेशन व साक्षी पेट्रोलियम रिधोरे दरम्यान आंदोलकांनी ट्रॅक्टरचे चारही टायर फोडले. हा प्रकार हॉटेल शिवराय जवळ घडला आहे.मात्र साखर कारखानदारांनी कारखाना सुरू होऊन जवळपास दहा ते पंधरा दिवस उलटून देखील ऊस दराविषयी आपली भूमिका जाहीर केली नाही. पंढरपूर तालुक्यात बाजीराव विहीर परिसरात पहिली टायरफोड घटना घडली आणि त्यापाठोपाठ याचे लोण जिल्ह्यात पसरू लागले आहे.

पिराची कुरोली फाटा, दसूर पाटी, शेळवे, जुना अकलूज रोड अशी विविध ठिकाणी वाहनाचे टायर फोडले जात असून यामुळे वाहनचालक मालक धास्तावलेले आहेत. आत्तापर्यंत पन्नास साठ वाहनाचे टायर फुटले असून संघर्ष समिती अधिकच आक्रमक होत चालली आहे.

### ऊस वाहतूक रोखण्यासाठी भजन आंदोलन...

**मंगळवेढा तालुक्यात असणाऱ्या चार कारखान्यांची ऊस वाहतूक रोखण्यासाठी बोराळे येथील चौकातच चार ते पाच गावातील शेतकरी एकत्र येत रात्री खडा पहारा देण्यासाठी चक्क विठ्ठलाचा धावा करीत भजन आंदोलन सुरू केले. या भजनाच्या माध्यमातून 'बा..विठ्ठला कारखानदारांना सद्बुद्धी दे' अशी मागणी करीत रात्र जागून काढली. अशीच अनोखी आंदोलने प्रत्येक गावागावातील चौकात पुढील काळात होणार असल्याचे ऊसदर संघर्ष समितीने सांगितले.**



# आ.शहाजीबापूंनी मारला 'उत्तम' तीर, जानकरांचा दिल आया भाजपवर फिर

✔ सुराज्य/सोलापूर

सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी नुकतीच माळशिरस तालुक्यातील राष्ट्रवादीचे नेते उत्तम जानकर यांना समवेत घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथील सागर या निवासस्थानी भेट घेतली आहे. त्यामुळे तालुक्यात तर्क वितरकांना उधाण आले आहे. शहाजीबापूंनी सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात नवा तीर मारण्याचा 'उत्तम' प्रयत्न केला असला तरी मोहिते-पाटील यावर काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सध्या सोलापूर जिल्हा भाजपाचा गड झाला आहे. अपक्षासह ७ आमदार आणि दोन खासदारांमुळे पक्ष भक्कम स्थितीत आहे. अल्पावधीत भाजपाने राजकीय किमया साधत सोलापूर जिल्ह्यावर निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे. सत्तांतरानंतर भाजपात येण्यासाठी अनेक नेते उत्सुक झाले आहेत. अशातच आता शिंदे गटाचे आमदार असलेले शहाजीबापू पाटील यांनी उत्तम जानकर यांना घेऊन थेट फडणवीस यांची भेट घेतली आहे. त्यामुळे जानकर राष्ट्रवादी सोडण्याच्या विचारात आहेत की काय अशी चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे. भाजप-सेनेची सत्ता असताना जानकर हे



स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून भाजपबरोबरच होते. त्यांना माळशिरसमधून उमेदवारी मिळेल, असे वाटत होते. मात्र ऐनवेळी भाजपाने राम सातपुते यांना उमेदवारी दिल्याने जानकर यांनी राष्ट्रवादीची वाट धरली होती. आता फडणवीस यांची भेट घेतल्याने जानकर पुन्हा भाजपच्या जवळ येणार का, अशी चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे.

# अल्पवयीन तरुणीचे अपहरण; तिघांना ३ वर्षे सक्तमजुरी

✔ सुराज्य/सोलापूर

एका अल्पवयीन तरुणीला मोटारीतून पळवून नेऊन अपहरण केल्याच्या आरोपावरून महादेव मल्लेशा बिराजदार (वय३०) राजशेखर पुंडलिक कोकरे (वय २६) आणि रमेश मल्लेशा बिराजदार (वय ३८ सर्व रा.तेलगाव ता. उत्तर सोलापूर) या तिघांना ३ वर्षे सक्त मजुरी आणि प्रत्येकी ३ हजार रुपये दंड अशी शिक्षा विशेष न्यायाधीश व्ही.पी. आव्हाड यांनी मंगळवारी सुनावली.



या खटल्याची पार्श्वभूमीवर अशी,३ फेब्रुवारी २०१७ रोजी ती अल्पवयीन मुलगी विजापूर रोड परिसरातून निघाली होती. त्यावेळी महादेव आणि रमेश बिराजदार या दोघांनी तिला सैफुल येथे अडवून घराकडे सोडतो असे सांगितले. ओळखीचे असल्याने मुलगी मोटारीत बसली. मोटर घराकडे न जाता दुसऱ्याच ठिकाणी जात असल्याने तिने विचारणा केली. तेव्हा त्यांनी तिलातोंड दाबून धमकी दिली.मोटर चडचण येथे आल्यानंतर त्यापैकी रमेश हा निघून गेला. त्यावेळी महादेव याने राजशेखर याला बोलावून घेतले. आणि पुढे जाताना मोटर मुचंडी (ता.जत जि.सांगली) येथे वाटेत बंद पडली. आजूबाजूच्या लोकांना संशय आल्यानंतर त्यांनी पोलिसांना बोलावून घेतले. पोलीस पाटलांनी या संदर्भात जत पोलिसात तक्रार दाखल केली. दरम्यान मुलीच्या काकांनी विजापूर नाका पोलिसात मिसिंगची तक्रार दिली होती. या प्रकरणात विजापूर नाकाच्या पोलिसांनी तिघांविरुद्ध अपहरण आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. आणि आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. या खटल्यात सरकारतर्फे ७ साक्षीदार तपासण्यात आले.

मूळ फिर्यादीची साक्ष आणि सरकार पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींना वरील शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारतर्फे ॲड. शीतल डोके तर आरोपीतर्फे ॲड. व्ही. डी.फताटे यांनी काम पाहिले.

## चौकशी पूर्ण होताच डॉ.किरण लोहार यांच्यावर कारवाई : सीईओ स्वामी

✔ **सोलापूर** : शिक्षणाधिकारी किरण लोहार यांची संपूर्ण चौकशी होताच त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले. त्यांच्यावरील कारवाई ही जे इ डी किंवा सीईओ यांच्याकडून होत नसते तर त्यांची संपूर्ण चौकशी होताच शिक्षण विभाग आयुक्तालय यांच्याकडून कारवाई केली जाते.

पुढे बोलताना स्वामी म्हणाले की ॲंटी करप्शन रीड होण्यापूर्वी जवळपास दोन ते तीन महिन्यापासून आपण संबंधित अधिकाऱ्याला त्यांच्या वागण्यात तसेच बोलण्यात आपण सुधारणा करावी याबाबत मागील दोन चार महिन्यापासून सूचना करीत आलो आहोत लेखी आणि तोंडी अशा दोन्ही प्रकारच्या सूचना करून सुद्धा त्यांच्या वागणे आणि बोलण्यामध्ये फरक पडला नाही त्यामुळे काल झालेला प्रकार घडला असावा असे मला वाटते सूचना करून सुद्धा खालचे अधिकारी ऐकत नसतील तर आम्ही काय करायचे असाही सवाल स्वामी यांनी केला.

## ऊसतोडी ट्रॅक्टर चालकाचा मंद्रूपमध्ये खून

✔ **दक्षिण सोलापूर** : ऊसतोडी ट्रॅक्टर चालक रमेश केशव मिसाळ वय-३४ रा.खोकरमोहा ता. शिरूर कासार जि.बीड याचा खून करून मृतदेह पोत्यात भरून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुकादमासह पाच जणांना मंद्रूप पोलिसांनी अटक केले आहे.

याबाबत मंद्रूप पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, मंद्रूप येथील सीतामाई तलावाजवळ सोमवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास मुकादमच्या पत्नीला त्याचा मित्र ऊसतोडी ट्रॅक्टर चालक यांनी वाईट बोलल्याने त्यांच्यात वाद चालू होता त्याच वेळी अभिमान साबळे, अशोक गिरी, मलप्पा कांबळे, मनीषा साबळे, अंजना गिरी यांनी त्यास मारहाण करु लागले. त्यावेळी अभिमान साबळे व अशोक गिरी याने लाकडी काठी ने पाठीवर दोन्ही पायावर व दोन्ही हातावर मारहाण केल्याने मृत्यू झाला. या बाबतची फिर्याद बाळू भानुदास पवार, रा. पारडी (ता. लोहा जिल्हा नांदेड) यांनी मंद्रूप पोलिसात दिली आहे. या घटनेची माहिती मिळताच घटना स्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी भेट देऊन पाहणी केली. घटना स्थळावरून आरोपी अभिमान साबळे, अशोक गिरी (दोघे रा.मलकाचीवाडी ता.शिरूर कासार जि.बीड), मलप्पा कांबळे (रा.सादेपूर), मनीषा अभिमान साबळे, अंजना गिरी (दोघी रा.मलकाचीवाडी ता.शिरूर कासार जि.बीड) यांना ताब्यात घेऊन अटक केले आहे. पुढील तपास साहाय्य पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे हे करीत आहेत.

## आरोग्य विभागात नोकरी लावतो म्हणून तरूणाची फसवणूक

✔ सुराज्य/सोलापूर

आरोग्य विभागात नोकरी लावतो म्हणून तरुणाची सात लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या संतोष सिध्दाराम माने याला शहर गुन्हे शाखेने सोमवारी कोल्हापूर येथून अटक केली. ही कामगिरी गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार श्रीकांत पवार, राहुल तोग्गे, गणेश शिंदे व सतीश काटे यांच्या पथकाने केली आहे. एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यावर तो दोन वर्षांपासून फरार होता.न्यायालयाने त्यांना फरार घोषित केले होते.पोलिसांनी संशयित आरोपी संतोष माने याला न्यायालयात हजर केले असता सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नवी म्हण 'सौ लोहार की एक लाचलुचपत की'

| कल्याण |
| --- |
| 470-10-190 |

| मेन बाजार |
| --- |
| 688-20-136 |

# उपमुख्यमंत्री फडणवीस शुक्रवारी जिल्हा दौऱ्यावर

## ▪ मंगळवेढा, बार्शीत होणार कार्यक्रम; जय्यत तयारी सुरू

✔ सुराज्य/सोलापूर

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्तिकी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी ३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात येणार आहेत. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथमच ते जिल्ह्यात येणार असल्याचे भाजप नेत्यांकडून त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. फडणवीस यांच्या या दौऱ्यात मंगळवेढा आणि बार्शी तालुक्यामध्ये त्यांचे दोन मोठे कार्यक्रम होणार आहेत. या सर्व कार्यक्रमांना जिल्ह्यातील सर्व आमदारांची भाजप नेत्यांची मोठी मांदियाळी जमणार आहे. त्यामुळे फडणवीस यांच्या या दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

पंरपरेनुसार कार्तिकी एकादशीला उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा होते. ४ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशीचा सोहळा होणार आहे. ४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री शासकीय महापूजा होईल. देवेंद्र फडणवीस यांचे ३ नोव्हेंबर रोजी रात्री



पंढरपुरात आगमन होणार आहे. शासकीय महापूजा झाल्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी ते दोन कार्यक्रमांना हजेरी लावणार आहेत. मंगळवेढा तालुक्यातील आमदार समाधान आवताडे यांच्या आवताडे शुगर्सच्या मोळी पूजनाचा कार्यक्रम दुपारी १२ वाजता होणार आहे. त्यानंतर आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शी येथे दोन कार्यक्रमांचे आयोजन केले आहे .दुपारी अडीच वाजता एका खासगी सोयाबीन प्रकल्पाचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर बार्शी नगरपालिकेच्या माध्यमातून कार्यान्वित झालेल्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे लोकार्पण फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना जिल्ह्यातील भाजपच्या नेत्यांची गर्दी होणार आहे. सर्व आमदारांसह दोन खासदारांचीही या कार्यक्रमांना उपस्थिती असणार आहे.

**आवताडे, राऊत होणार चार्ज :** फडणवीस यांनी शुक्रवारच्या दौऱ्यात सोलापूर शहराला वेळ दिला नाही. ते केवळ आ. आवताडे आणि आ. राऊत यांच्या कार्यक्रमांना त्यांच्या मतदारसंघात हजेरी लावणार आहेत. त्यामुळे हे दोन्ही आमदार आता चार्ज झाले आहेत. दोघेही कार्यक्रमाच्या तयारीला लागले आहेत. राजा राऊत यांना मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याची चर्चा आहे, अशातच फडणवीस त्यांच्या कार्यक्रमांना येत असल्याने चर्चेला आणखी बळ मिळणार आहे.

**कोणते नेते भेटणार याची उत्सुकता :** फडणवीस यांच्या पंढरपूरच्या दौऱ्यात इतर पक्षातील कोणते नेते भेटणार याची उत्सुकता लागून राहिली आहे. सध्या मोहोळचे माजी आ. राजन पाटील भाजपमध्ये जाणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. नुकत्याचा एका कार्यक्रमात त्यांनी याचे संकेतही दिले आहेत. त्यामुळे ते फडणवीस यांची भेट घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष आहे. याशिवाय पंढरपूर आणि माळशिरसमधील एक नेताही भाजपच्या संपर्कात आहे, तेही फडणवीस यांना भेटणार का हे पाहणे औत्सुक्याचे राहणार आहे.

CMYK